# माझा ’निर्माण’ प्रवास

गेले दोन वर्ष मी पुण्यात ‘South Asia Network on Dams Rivers and People’ (SANDRP) या संस्थेबरोबर काम करते आहे. नद्या, त्यांच्यावर बांधली जाणारी धरणं, त्या धरणांमुळे निर्माण होणाऱ्या पर्यावरणीय आणि सामाजिक समस्या, त्या निर्माण होण्यामागची कारणं, त्यामागची सरकारी यंत्रणा या सगळ्याचा समग्र अभ्यास करून ती माहिती लोकांसमोर आणणं, प्रसार माध्यमांसमोर आणणं, सरकारला प्रश्न विचारणं, आणि एकंदर नद्या आणि धरणं यांबाबतच्या घडामोडींवर ’watch dog’ सारखं काम SANDRP १९९८ पासून करत आहे.

’पर्यावरणासाठी काहीतरी करायचं’ इथपासून ते आता करत असलेल्या कामापर्यंतचा हा प्रवास डॉ. अभय आणि राणी बंग यांनी गडचिरोलीला त्यांच्या सर्च या संस्थेत युवांसाठी सुरू केलेल्या ’निर्माण’ शिबिरांपासून सुरू झाला.

२००८ साली मी निर्माण शिबिरांमधे सहभागी झाले आणि अचानक अलीबाबाच्या गुहेत (किंवा अंकल स्क्रूजच्या तळघरात) शिरल्यासारखं वाटलं! आज आठ वर्षांनीही ते वाटणं तसंच आहे. तितकंच नवं, ताजं आहे. पहिल्या शिबिरासाठी आलेली मी आणि आत्ताची मी यात अमूलाग्र बदल झालाय. हा बदलाचा प्रवास अत्यंत आनंददायी होता. सोपा नक्कीच नव्हता. अनेक चढ उतार, खाचखळगे तर खूपच. आणि तरीही आज जेव्हा मी या प्रवासाचा ताळेबंद मांडते तेव्हा प्रत्येक वेळी जाणवतं की मी अपेक्षा केली होती, कल्पना केली होती त्यापेक्षा कितीतरी पट जास्त या प्रक्रियेकडून मिळालं आहे. ही सगळी प्रक्रिया आयुष्याला एक पूर्णपणे नवी दिशा देणारी ठरली. इतकी की ती शब्दांत माडणंही अवघड!

साधारण सहावी-सातवीत असताना पर्यावरणाचा किडा डोक्यात शिरला. तेव्हापासून ते आर्किटेक्चरच्या तिसऱ्या वर्षापर्यंत ’पर्यावरणासाठी काहीतरी करायचं’ या विचारानी चांगलंच मूळ धरलं. त्याच वर्षी अहमदाबादच्या CEPT University मधे असलेल्या M.Tech (Environmental Planning) या अभ्यासक्रमाविषयी कळलं आणि त्याचं एकंदर वर्णन ऐकून आर्किटेक्चर नंतर मी त्यासाठी प्रवेश घेतला. त्याअंतर्गत आणि त्यानंतर मुंबईमधे वर्षभरासाठी केलेल्या नोकरीचं साधारण स्वरूप म्हणजे विकासाच्या नावाखाली पर्यावरणाची जी काही हानी होते आहे त्याची जमेल तशी डागडुजी अशा प्रकारचं काम होतं. अजून परखड शब्दात सांगायचं तर विकास कामांसाठी पर्यावरण पूरकतेचा मुखवटा तयार करण्याचं ते काम. पण मुळात विकासाच्या संकल्पनेला प्रश्न विचारण्याइतकं खोलवर कोणी बोलतंच नव्हतं. हे काही खरं नाही, अजून खोलात शिरलं पाहिजे, सगळ्याचा मुळातून विचार करायला पाहिजे असं मला सतत वाटायचं. निर्माणमधे आल्यावर खात्री झाली की अशाच प्रकारच्या विचारांना खतपाणी घालणारी आणि कृतीसाठी उद्युक्त करणारी ही प्रक्रिया आहे. म्हणून मग २००९ साली होती ती नोकरी सोडून वर्षभरासाठी निर्माणची फेलोशिप घ्यायची असं मी ठरवलं. पूर्ण अंधारात उडी होती. या फेलोशिप प्रकरणात मी नक्की काय करणार हे मलाच माहित नव्हतं. आणि तरीही मी जे काही शोधते आहे त्याकडे नेणारीच ही वाट आहे याची खात्री होती. “मला काहीतरी खरंखुरं, real काम करायचं आहे” असली काहीतरी फॅन्सी उत्तरं मी तेव्हा बाबांना दिली होती. त्यावर त्यांनी अनेक विशेष चेहेरे केल्याचंही मला आठवतं.

अनेक वळणांचा, अनेक टप्प्यांचा हा प्रवास असा सुरू झाला. सुरुवातीलाच एका मोठ्या प्रश्नाला सामोरं जायला लागलं, पर्यावरणासाठी काही तरी करायचं म्हणजे नक्की काय? निर्माणच्या शिबिरांमधून आणि फेलोशिपमधून याचं उत्तर मिळवण्याच्या दिशेने प्रवास सुरु झाला. माझी host organization- MKCL च्या जोडीने शाळेतील विद्यार्थीमध्ये पर्यावरणाबाबत जागृतीवर काम केलं. त्याचबरोबर चेतना विकास, आरती, गोमुख अशा अनेक संस्थांना भेटी त्यांच्याबरोबर काही काम करता येईल का असे प्रयत्न अशा अनेक भानगडी करून झाल्या. पण प्रत्येकच वेळी असं झालं की त्या-त्या ठिकाणी ज्या प्रकारच्या ज्ञानाची आणि कौशल्यांची गरज होती ती माझ्याकडे नव्हती. शिवाय माझा पिंड मुळात Academic आहे. Management चा नाही. एक वर्ष फेलोशिप घेऊनही बहुदा काहीच हाती लागणार नाही असं वाटायला लागलं. पण म्हणून शोध थांबणार तर नव्हता. मग स्वतःच एखादा platform तयार करता येईल का म्हणून स्वतःची कंपनीपण काढून झाली. मनासारखं काम करायला मिळत नव्हतं आणि पेशन्स संपत चालला होता. एकूणच माझ्यासाठी तो अवघड काळ होता.

मला हवी तशी संधी मिळाली ती प्रयास ऊर्जागटाबरोबर दोन महिन्यासाठी एका अहवालावर काम करताना. डॉ. अभय बंग (म्हणजे आम्हा निर्माणींचे 'नायना') हे २०११ साली डॉ. विजय केळकर यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या महाराष्ट्राच्या समतोल प्रादेशिक विकासाच्या प्रश्नावरील उच्चस्तरीय समितीचे (केळकर समिती) सदस्य होते. प्रयास ऊर्जा गटातर्फे त्या समितीसाठी कोळशावर चालणाऱ्या औष्णिक विद्युत प्रकल्पांच्या पर्यावरणीय परिणामावर एक अहवाल तयार करण्यात येणार होता. त्यासाठी श्रीपाद धर्माधिकारींना, जे या अहवालाचं काम बघत होते, रिसर्च असिस्टंटची गरज होती. तेव्हा नायनांनी माझं आणि सजल कुळकर्णी या निर्माणमधल्या आणखी एका मित्राचं नाव सुचवलं. ते काम करताना पर्यावरणीय परिणामांबाबतची अनेक कायदेशीर कागदपत्र, अनेक कोर्टाचे निर्णय, शासन निर्णय, माधव गाडगिळांनी पश्चिम घाटासंदर्भात दिलेला अहवाल अशी अनेक महत्वाची कागदपत्र पहिल्यांदाच नजरेखालून गेली. त्यांचा अभ्यास करताना, analysis करताना policy advocacy च्या कामाचा आवाका लक्षात आला. श्रीपाद सरांकडून शिकायलाही खूप मिळालं. आणि मुख्य म्हणजे हा अभ्यास करताना एकदम 'आवडीचं काम' करतानाचं समाधान वाटलं कारण हे काम वास्तवाशी नाळ जोडलेलं असं होतं.

प्रयासची कामाची पद्धत आवडल्यामुळे मी त्याच संस्थेत काम मिळण्याच्या दृष्टीनी प्रयत्न केले. योगायोगानी प्रयासच्या उपजीविका आणि संसाधने गटामधे पाणीपुरवठ्याचे खासगीकरण करण्यामुळे निर्माण झालेल्या प्रश्नांचा अभ्यास करणाऱ्या एका प्रकल्पासाठी काम करायची संधी मिळाली. इतके दिवस मी ज्या प्रकारचं काम शोधत होते तशाच प्रकारचं काम करणाऱ्या अनेक व्यक्ती आणि संस्था या निमित्तानी समोर आल्या. एक वर्षाच्या या अभ्यासात आम्ही महाराष्ट्रातल्या तीन शहरामधल्या पाण्याच्या खाजगीकरणाचा अभ्यास केला. सरकारी कामाच्या दिरंगाईवर एक उपाय म्हणून खाजगीकरणाकडे बघितलं जातं. सामान्यपणे असं गृहित धरलं जातं की सरकारी यंत्रणांमधला भ्रष्टाचार आणि राजकीय हस्तक्षेप यांना दूर ठेवल्यामुळे खाजगी कंपन्या अधिक सक्षमपणे आणि परिणामकारकरित्या पाणीपुरवठा करू शकतात. पण आमच्या अभ्यासातून जे समोर आलं ते धक्कादायक होतं. राजकीय हस्तक्षेपामुळे खाजगी कंपन्या आणि महापालिका यांच्यात केलेल्या करारांमधे जाणीवपूर्वक अनेक तृटी ठेवल्या जातात. जेणेकरून कंपनीचा नफा अबाधित राहील पण दर्जेदार

पाणीपुरवठा सेवा देण्यापासून मात्र त्यांना सवलत मिळेल. एक लहानसं उदाहरण देते. भिवंडी शहराच्या करारात असं लिहिलेलं आहे की हा करार शहरातील 'निवडक प्रभागांना लागू' असेल. ह्या निवडक प्रभागांची व्याख्या 'परिशिष्ट अमुक-अमुक' मधे दिलेल्या यादीप्रमाणे अशी केलेली. प्रत्यक्षात करारात ते परिशिष्ट मात्र रिकामं! किंवा समजा कंपनीला पुरेसा आर्थिक परतावा मिळाला नाही तर महापालिका त्यासाठी भरपायी करायची हमी देते. त्यासाठी महापालिका किती रक्कम, ती कशी देणार याचे सगळे तपशील करारात आहेत. मात्र कंपनीनी जर ठरलेल्या दर्जाचा पाणीपुरवठा केला नाही तर त्यांनी दंड भरायची कोणतीही तरतूद करारात नाही. ही केवळ वानगीदाखलची उदाहरणं आहेत. करारांमधल्या तृटी हा केवळ एक भाग झाला. मुळात पाणी ही जीवनावश्यक वस्तू असताना त्याला विक्रेय वस्तूचा दर्जा देणं कितपत योग्य आहे? यासारखे तात्विक मुद्देही आहेतच. हा अभ्यास म्हणजे अक्षरशः खाडकन डोळे उघडणारा होता. धोरणं आणि वास्तव यातली तफावत किती असू शकते याची या आधी कल्पनाच नव्हती. मला प्रयासबरोबरंच काम करायला नक्कीच आवडलं असतं. पण काही कारणांमुळे प्रयासचा संसाधने आणि उपजीविका गटच पुढे पार्यरत असणार नव्हता. मग नाईलाजानी आम्हाला सगळ्यांनाच इतर पर्याय शोधावे लागले.

प्रयासमधे काम करताना सॅंडर्पनी बनवलेले अनेक अहवाल मी संदर्भासाठी अभ्यासले होते. आणि पुण्यातही सॅंडर्पचं एक ऑफिस आहे असं कळलं होतं. म्हणून मी श्रीपाद धर्माधिकारींना विचारलं की तिथे काम करता येऊ शकेल का. पुन्हा एकदा योगायोगानी इथे माणसांची आवश्यकता होती आणि परिणीता दांडेकर बरोबर मी रुजू झाले. सध्या गेले जवळजवळ ३ वर्ष मी इथे काम करते आहे. ही संस्था मुख्यतः नदी, त्यावर बांधली जाणारी धरणं आणि एकंदर नद्यांसाठीची आणि पाण्यासाठीची सरकारी यंत्रणा यांचा अभ्यास, विश्लेषण करायचं काम करते. मुळात आपल्याकडे नदीवर सरकारचा हक्क आहे. सरकार नदीच्या पाण्याचं पिण्याचं पाणी, शेती, निरनिराळे उद्योग इ. वेगवेगळया क्षेत्रांसाठी वाटप करू शकतं. ज्या पद्धतींनी हे वाटप केलं जातं आणि ते करण्यासाठी ज्या पद्धतीनी धरणं बांधली जातात त्या सरकारी यंत्रणांमधे फार गंभीर तृटी आहेत.

धरणाचा प्रस्ताव मांडताना पाण्याची गरज किंवा मागणी जी गृहीत धरली जाते ती तितक्या सुयोग्य पद्धतीने मोजलेली असते का? धरणांचे प्रस्ताव बनवताना जे फायदे गृहीत धरले जातात तितके फायदे प्रत्यक्षात मिळतात का? धरणांची किंमत जी प्रस्तावित असते त्याच किंमतीत ती बांधली जातात का? खर्च आणि फायद्याचं जे गुणोत्तर (Cost – Benefit Ratio) गृहीत धरतात तेवढं बांधल्यावर राहतं का? धरणांचे प्रस्ताव मंजूर होताना आणि ती बांधली जाताना कायद्याच्या चौकटी पाळल्या जातात का? विस्थापितांना न्याय्य मोबदला मिळतो का? धरणांच्या पाण्याचा उपयोग ज्या कारणांसाठी प्रस्तावित असतो तसाच प्रत्यक्षात होतो का? या प्रश्नांची उत्तरं मिळवण्यासाठी जरा आकडेवारी तपासली की असं लक्षात येतं की वस्तुस्थिती काही वेगळीच आहे.

धरण बांधताना आपण नदी नावाच्या निसर्गातल्या एका अत्यंत महत्वाच्या प्रणाली बरोबर खेळत असतो. नदी म्हणजे केवळ पाणी नाही. तर पाण्याबरोबर गाळ, अनेक प्रकारचे जीव जंतू, पाणवनस्पती, जलचर अशा सगळयांना घेऊन ती वाहत असते. वाहणं हा तर तिचा मूळ स्वभाव. अनेक प्रदेश, परिसंस्था, भूभाग, भूस्तर, भूजलाचे साठे इ. मधला ती दुवा असते, त्यांचं पोषण ती करत असते. याशिवाय नदीकाठी वसलेल्या अनेक

मानवी वस्त्या आणि संस्कृतींना जोडणारा ती धागा असते. नदीवर धरणं बांधून तिला थांबवणं म्हणजे एका प्रकारे या जिवंत व्यवस्थेचं मरणंच. याचे अनेक गंभीर अणि दूरगामी परिणाम तिच्यावर अवलंबून असलेल्या सर्व घटकांवर होतात. शिवाय आज सर्व धरणे ही पाणी अडवून धरण्याचे, ते मनाप्रमाणे वळविण्याचे, पळविण्याचे, त्याचे राजकारण खेळण्याचे एक साधन बनली आहेत. न्याय्य पाणी वाटपाचे अनेक प्रश्न यातून उभे राहिले आहेत. शिवाय ज्यांच्या हक्कांवर पाय देऊन हा डोलारा उभा आहे त्या विस्थापितांचं पुनर्वसन हाही एक गंभीर मुद्दा आहे.

नर्मदा बचाव आंदोलनातून सुरू झालेलं हे काम. आमच्या संस्थेचे संस्थापक हिमांशु ठक्कर हे नर्मदा बचावमधल्या अगदी सुरवातीच्या फळीतले कार्यकर्ते. तिथे काम करताना त्यांना असं लक्षात अलं की 'धरण' ही एकदा legal entity म्हणजे ज्याला सरकारची मान्यता आहे अशी बाब बनली की हातात फारसं काही उरत नाही. त्यासाठी धरणांचे प्रस्ताव मंजूर होण्याच्या प्रक्रियेमधे सहभागी होणं आवश्यक आहे या उद्देशातून ही संस्था उभी राहिली.

नदी, धरणं आणि एकूणच पाणी प्रश्नाचे विविध आयाम हळूहळू समजताहेत. काम करत असलेल्या विषयाची हळूहळू पकड येते आहे. Ownership वाढते आहे. ते analysis मधे आणि लिखाणात दिसून येतं आहे. जेव्हा तुम्ही सरकारी यंत्रणांच्या कामाची शहानिशा करता तेव्हा अत्यंत मार्मिकपणे मुद्दे मांडणं आवश्यक असतं. आपण केलेल्या कामाचा शक्य तितका उपयोग व्हावा, त्याचा परिणाम दिसावा याचा प्रयत्न चालूच आहे. पण त्याला मर्यादा पण आहेत. त्यामुळे तसा अट्टाहास करून उपयोग नाही. तेव्हा कामातून मिळाणाऱ्या आनंदासाठीच काम करणं उत्तम अशा विचारांत मी सध्या आहे.

हा सगळा प्रवास निर्माण प्रक्रियेबरोबर सुरू झाला. निर्माणमुळे झालेली सगळयात महत्वाची गोष्ट म्हणजे fear of failure, अपयशाची भीती पुसून टाकणं. या भीतीपायी मी पुष्कळदा कोषात जायचे. पण निर्माणच्या अगदी पहिल्या शिबिरात 'सेवाग्राम ते शोधग्राम' प्रवास सांगताना नायनांनी त्यांचा पहिला रिसर्चचा प्रयत्न कसा फसला गेला हे अगदी सविस्तर सांगितलं. तोपर्यंत चुका करणं, अपयश येणं, हे नैसर्गिक आहे, त्यात 'भयंकर' वगैरे काही नाही हे कधी लक्षातच आलं नाही. कारण प्रत्येकच वेळी मार्क, डिग्री, नोकरी असं काहीतरी पणाला लागलेलं असायचं. पण नायनांच्या तोंडून अपयशाची कथा ऐकल्यावर वाटलं अरे! यांच्यासारखा मोठा माणूस चुकू शकतो तर मग आपण चुकलो तर काय हरकत आहे? पण चुकांवर काम करत शिकायला एक सुरक्षित अवकाश लागतो. तो अवकाश आम्हाला निर्माणमधे मिळाला. आम्ही करत असलेल्या अगदी छोट्यातल्या छोट्या प्रयत्नांना सीरियसली घेणारे, आमच्यावर विश्वास ठेवणारे, वेळोवेळी कौतुकाची थाप देणारे नंदा खरे, डॉ. अभय बंग, विवेक सावंत यांच्यासारखे अनेक मेंटर्स आम्हाला फेलोशिपदरम्यान मिळाले. 'करून तर बघू, फार काय होईल... चुकेल' ही वृत्ती मिळाली. आणि चुकांमधून शिकायचा leaning attitude मिळाला. मुळात चुका न लपवता, न झाकता, त्यांच्यापासून न पळता त्या प्रामाणिकपणे कबूल करायची सवय लागली.

समजा आपल्या कुठल्या एखाद्या सामाजिक समस्येवर काम करायचं असेल तर आपण आपली कौशल्य आणि क्षमता यांना अनुसरून काम निवडावं ही समज पण निर्माणनी दिली. मी सध्या करत असलेलं काम किंवा

प्रयासमधे केलेलं काम यामधे माझा मुळचा स्वभाव जो अभ्यासकाचा आहे (activist चा नाही), माझा skillset (जो CEPT मधून मिळाला) आणि सध्याची पर्यावरणाच्या प्रश्नांसाठी काम करण्याची गरज (म्हणजे कदाचित स्वधर्म आणि युगधर्म) याचा चपखल मेळ बसलेला दिसतो. तो बसेपर्यंत चिकाटीनी शोध घ्यायची जिद्द पण निर्माणनी दिली. अनेक क्षेत्रांमधे उत्तम काम करणाऱ्या अनेक व्यक्तींची ओळख निर्माणनी करून दिली.

पण या सगळ्या सगळ्याच्या पलिकडे जाऊन जर मला निर्माणनी काही दिलं असेल तर ती म्हणजे अनेक मित्रमैत्रिणींचा परिवार आणि त्यांची निखळ मैत्री. स्वतंत्र विचार करणारे, एखाद्या विषयात झोकून देऊन काम करणारे, कलेची उत्तम जाण असणारे, असे अनेक मित्रमैत्रिणी मला इथे मिळाले. मी या सगळ्यांमधे येऊन खूप बदलले. माणूस म्हणून जास्त प्रगल्भ  झाले. मला वेगवेगळ्या दृष्टीकोनांचा चा एक मोठा पट बघायला मिळाला आणि मी तो judge न करता तो accept करायला किंवा acknowledge करायला शिकले. चांगली मैत्री ही किती दुर्मीळ गोष्ट आहे आणि ती तुम्हाला किती बदलू शकते आणि ती तुम्हाला किती secure बनवू शकते ही खरोखर अनुभवण्याची गोष्ट आहे.

प्रत्येकाचं आयुष्य त्याला कोणत्या ना कोणत्या प्रकारे surprise करत असतं. म्हणजे असं काहीतरी कल्पनाच न केलेलं घडतं की आयुष्याची दिशाच बदलून जाते. निर्माणची शिबिरं ही अशीच एक घटना होती. इथे माझ्यासारखे अनेक जण येऊन खूप अमूलाग्र बदलले. आणि हा बदलाचा प्रवास अजूनही चालूच आहे. म्हणतात ना ’only change is constant’.

**अमृता प्रधान, ९४२३०४८५५७, amrutapradhan@gmail.com**



